



# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२८८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. १३ डिसेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## महायुती सरकारचा उद्या मंत्रिमंडळ विस्तार मंत्रिपदाचा फॉर्म्युलाही फायनल; राजभवनवर लगबग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १३ मुंबई**

महायुती सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार शनिवारी होण्याची शक्यता असून राजभवनात शपथविधीच्या तयारीला सुरुवात झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. शनिवारी सकाळी ११ वाजता किंवा सायंकाळी ४ वाजता नव्या मंत्र्यांचा शपथविधी होणार असल्याची माहिती आहे.

महायुती सरकारच्या मंत्रिपदाच्या नावावर अंतिम शिक्कामोर्तब झालं असून उद्या नवीन मंत्री शपथ घेणार आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीप्रमाणे, राष्ट्रवादीचे १०, शिवसेनेचे १२ आणि भाजपचे २१ मंत्री शपथ घेणार आहेत. त्यामध्ये कॅबिनेट आणि राज्यमंत्रिपदाचा समावेश आहे.

एकनाथ शिंदेंच्या नाराजीमुळे मंत्रिमंडळाचा विस्तार पुढे जाईल अशी चर्चा होती. पण आता शनिवारी हा शपथविधी होणार असल्याची माहिती आहे. राजभवनावर त्याची तयारी सुरू आहे. नागपुरातील हिवाळी अधिवेशनापूर्वी मंत्रिमंडळ विस्तार करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं होतं. मंत्रीपदासाठी निवडलेल्या




नावांवर दिल्लीत चर्चा झाल्याचं बोललं जात आहे.

शिवसेनेचे १२ मंत्री शपथ घेण्याची शक्यता असून त्यामध्ये ९ कॅबिनेट तर ३ राज्यमंत्री असणार आहेत. अब्दुल सत्तार, तानाजी सावंत आणि संजय राठोड यांच्या नावाला भाजपचा विरोध असल्याची माहिती आहे. त्यामुळे या तिघांचा पत्ता कट होणार असल्याची माहिती समोर येत आहे. शिवसेनेकडून उदय सामंत, शंभूराजे देसाई, गुलाबराव पाटील, दादा भुसे, प्रताप सरनाईक, संजय शिरसाठ, भरत गोगावले, आशिष जयस्वाल राज्यमंत्री म्हणून योगेश कदम, विजय शिवतारे, प्रकाश आबिटकर किंवा राजेंद्र पाटील यड्रावकर शपथ घेण्याची शक्यता आहे.

**नगरविकास खातं एकनाथ शिंदेंना मिळणार**

सुरुवातीपासून गृहखाते आणि नगरविकास खात्यासाठी आग्रही असणाऱ्या शिवसेनेला आता नगरविकास खातं देण्यास भाजपची तयारी असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्याचवेळी पर्यावरण खात्याऐवजी शिवसेनेला पर्यटन खातं देण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

**राष्ट्रवादीकडून बड्या नेत्यांची लॉबिंग सुरू**

अजित पवारांच्या राष्ट्रवादीला १० मंत्रिपदं देण्यात येणार असून त्यामध्ये ८ कॅबिनेट तर २ राज्यमंत्रिपदं असणार आहेत. त्यासाठी आता नेत्यांनी लॉबिंग सुरू केल्याचं चित्र आहेत. माजी मंत्री हसन मुश्रीफ, दिलीप वळसे पाटील यांनी अजित पवारांची देवगिरी निवासस्थानी भेट घेतली. तर त्याआधी माजी मंत्री धर्मराव बाबा अत्राम यांनीही अजित पवारांची भेट घेतली होती. त्याचवेळी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हे देखील उपस्थिती असल्याची माहिती आहे.

## एकनाथ शिंदे जनतेच्या मनावर राज्य करणारे लोकनेते, खुर्चीचे महत्त्व नाही : शहाजीबापू पाटील

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १३ मुंबई**

देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची, एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्रीपदाची आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलावून नवनिर्वाचित आमदारांना शपथबद्ध करण्यात आले. यानंतर विधानसभा अध्यक्ष म्हणून राहुल नार्वेकर यांनी बिनविरोध निवड करण्यात आली. परंतु, अद्यापही खातेवाटप आणि मंत्रिमंडळ विस्ताराबाबत महायुतीचा निर्णय झालेला नाही. खातेवाटपावरून एकनाथ शिंदे नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सातत्याने सुरू आहे. यावरून आता शहाजीबापू पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारच्या मंत्र्यांचा शपथविधी शनिवार, १४ डिसेंबर रोजी होणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. मात्र, यावेळी १५ ते २० मंत्र्यांचाच शपथविधी होण्याची शक्यता आहे. यात भाजपाचे आठ ते दहा, शिंदेसेना आणि अजित पवार गटाचे प्रत्येक चार



ते पाच मंत्री असू शकतात, असेही सूत्रांचे म्हणणे आहे. शिंदेसेनेला नेमकी किती आणि कोणती खाती दिली जाणार, याची माहिती घेण्याचा प्रयत्न अजित पवार गटाचे नेते करीत असल्याचे समजते. अजित पवार गटाला अर्थ खाते देण्यास भाजप तयार नसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

## हे निकाल आले नसते तर...; लोकसभेत प्रियंका गांधी यांचा भाजपवर जोरदार हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १३ नवी दिल्ली**

लोकसभेत संविधानावरील चर्चेदरम्यान प्रियंका गांधी यांनी केंद्रातील मोदी सरकारवर जबरदस्त निशाणा साधला आहे. लोकसभा निवडणुकीचे निकाल असे आले नसते, तर हे लोक संविधान बदलायलाही तयार होते, असे प्रियांका गांधी वाड्रा यांनी म्हटले आहे. वायनाडमधून खासदार म्हणून निवडून आल्यानंतर लोकसभेतील हे त्यांचे पहिलेच भाषण होते. यावेळी त्यांनी पंतप्रधान मोदींवरही थेट टीका केली. आजच्या राजाला वेष बदलणे तर माहीत आहे, मात्र जनतेत जाण्याची आणि टीका ऐकण्याची हिम्मत नाही, असे प्रियांका म्हणाल्या.



प्रियांका म्हणाल्या, आम्ही संविधानाची ज्योज जळताना बघितली आहे आणि हे एक सुरक्षा कवच असल्याचेही समजले आहे. एक असे सुरक्षा कवच, जे देशातील नागरिकांना सुरक्षित ठेवते. हे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे कवच आहे. मात्र, दुःखाची गोष्ट म्हणजे, आपले सत्ताधारी पक्षातील सहकारी, जे मोठ मोठ्या गप्पा मारतात, त्यांनी गेल्या १० वर्षांत हे सुरक्षा कवच तोडण्याचा पूर्ण प्रयत्न केला. संविधानात सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाचे वचन आहे. हे सुरक्षा कवच तोडण्याचे काम सुरू झाले आहे. लॅटरल एन्ट्री आणि खासगीकरणाच्या माध्यमाने हे सरकार आरक्षण कमकुवत करण्याचे काम करत आहे.

प्रियांका पुढे म्हणाल्या, जर लोकसभा निवडणुकीत हे निकाल आले नसते तर, यांनी संविधान बदलायलाही सुरुवात केली असती. खरे तर, हे वारंवार संविधान-संविधान करत आहेत, कारण यांना, देशातील जनता संविधान बदू देणार नाही, हे माहीत झाले आहे. यांना पराभूत होता होता हे लक्षात आले आहे.

**पंतप्रधान मोदींवर निशाणा**

पंतप्रधान मोदींवर निशाणा साधताना प्रियांका म्हणाल्या, पंतप्रधान संविधान कपाळावर लावतात, पण जेव्हा न्यायासाठी आवाज येतो, तेव्हा त्यांच्या कपाळावर सुरकुतीही नसते. भारतीय राज्यघटना हे संघाचे विधान नाही. हे त्यांना समजलेले नाही. करोडो देशवासीयांच्या हृदयात एकमेकांबद्दल प्रेम आहे, द्वेष नाही. यांच्या फुटीरतावादी धोरणांचे परिणाम आपण रोज पाहतो. राजकीय फायद्यासाठी संविधान तर सोडाच, पण देशाची एकात्मताही पणाला लावतील. संभलमध्ये पाहिले, मणिपूरमध्ये पाहिले. ते म्हणतात की देशाचे वेगवेगळे भाग आहेत. पण आपले संविधान सांगते की, हा देश एक आहे आणि एकच राहील. जिथे अभिव्यक्तीचे संरक्षक कवच होते, तिथे त्यांनी भीतीचे वातावरण निर्माण केले आहे. सत्ताधारी पक्ष ७५ वर्षांसंदर्भात बोलतात. पण या वर्षांत राज्यघटनेची ज्योत कधीही मंदावली नाही. जनतेने निर्भयपणे निदर्शने केले. ती संतप्त झाल्यावर तिने सरकारला आव्हान दिले. बड्या नेत्यांवरही आरोप केले. पण आज हे वातावरण नाही.

## बांगलादेशातील हिंदू अत्याचारावर गप्प का?; उद्धव ठाकरे कडाडले, भाजपावर घणाघात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १३ मुंबई**

बांगलादेशात जे हिंदूवर अत्याचार होतायेत त्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पाऊले उचलायला हवीत. जिथे अत्याचार होतायेत तिथे धमक दाखवण्याची गरज आहे. आमच्या खासदारांनी मोदींना भेटीची वेळ मागितली होती परंतु ती नाकारली गेली. पंतप्रधान खूप व्यस्त आहेत. त्यामुळे कदाचित बांगलादेशातीलहिंदूवरील अत्याचार त्यांच्या निदर्शनात आले नसतील. केंद्र सरकारने तात्काळ काय पाऊले उचलणार हे स्पष्ट करावे. संसदेत बाकीचे विषय एक दिवस बाजूला राहूद्या. बांगलादेशात हिंदूंवर होणारे अत्याचार त्यावर केंद्र सरकारने भूमिका स्पष्ट करावी अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी केली आहे. मातोश्रीवरील पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

उद्धव ठाकरे म्हणाले की, संसदेत महत्त्वाच्या विषयाला बगल देऊन चर्चा भरकटवली जातेय. बांगलादेशात हिंदूंवर अत्याचार होतायेत. २-३ महिन्यापूर्वी बांगलादेश क्रिकेट संघ भारतात आला होता तेव्हा आदित्य ठाकरे यांनी जर त्या देशात हिंदूवर हल्ले होत असतील तर त्यांच्या क्रिकेट संघाला इथं बोलावणे योग्य आहे का असा प्रश्न केला पण त्याला काही उत्तर आले नाही. आज तमाम हिंदूतर्फे माझी




पंतप्रधानांना विनंती आहे जसं आपण एका फोनमध्ये युक्रेनचं युद्ध थांबवले होते तसं बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचार रोखण्यासाठी पाऊले उचलायला हवीत. इथे बटेंगे कटेंगे करून उपयोग नाही. जिथे काही नाही तिथे छाती फुगवून दाखवण्यात अर्थ नाही पण जिथे अत्याचार होतायेत त्यांना आपली धमक दाखवण्याची गरज आहे असं त्यांनी सांगितले.

त्याशिवाय ८० वर्षापासून दादर स्टेशनवर हमालांनी बांधलेल्या हनुमान मंदिराला भाजपा सरकारने नोटीस पाठवली. रेल्वेच्या जागेवर अतिक्रमण केल्याचं म्हटलं आहे. ८० वर्ष जुने मंदिर भाजपा पाडायला निघाले हे कुठले हिंदुत्व?, मंदिराच्या जमिनीवर सिडको डोळा ठेवते. सरकार मंदिर वाचवू शकत नाही. भाजपाचं निवडणुकीपुरतं हिंदुत्व बाकी आहेत. हिंदू केवळ मतांपुरते राहिलेत. तुमच्या हिंदुत्वाची व्याख्या काय?. हिंदूंची मते पाहिजे, त्यांना भयभीत करायचे आणि सरकार आल्यानंतर मंदिरे सुरक्षित कशी आहेत? बांगलादेशातही आणि मुंबईतही मंदिर सुरक्षित नाही असा आरोप उद्धव ठाकरेंनी केला.

दरम्यान, आपल्या मुंबईतले मंदिर हमालाने कष्टाने बांधले आहे. हे मंदिर पाडण्याचा फतवा निघतो तेव्हा भाजपा आणि फडणवीसांचे हिंदुत्व काय करतेय, नवी मुंबईत मंदिराच्या जमिनीवर सिडकोचा डोळा आहे. एक है तो सेफ है मग मंदिर कुठे सेफ आहे? कटेंगे तो बटेंगे करत हिंदुंना घाबरवता कशाला?. बांगलादेशात हिंदू सुरक्षित नाहीत, माझ्या राज्यात हिंदूची मते पाडली जातायेत. ज्या हिंदूंच्या मतांवर तुम्ही निवडून आलात ते वाचवण्यासाठी तुम्ही काय करणार आहात? आधी सरकारने सांगावे. बांगलादेशातील इस्कॉन मंदिर जाळले गेले. मुख्य पुजाऱ्याला अटक झाली. आपले विश्वगुरू काय करतायेत? शेख हसीना भारतात येऊन सुरक्षित झाल्या परंतु बांगलादेशात हिंदू असुरक्षित आहे. युक्रेनचे युद्ध थांबवणारे बांगलादेशात हिंदू अत्याचारावर गप्प का? असा सवालही ठाकरेंनी उपस्थित केला.

## नायलॉन मांज्यावर कायमस्वरुपी बंदी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १३ अमरावती**

प्लॅस्टिक किंवा इतर कृत्रिम वस्तूपासून बनविलेल्या नायलॉन मांजा या पक्क्या धाग्याचा वापर पतंग उडविण्यासाठी होतो. या धाग्यामुळे पक्षी, तसेच मानवी जिवितास तीव्र इजा होण्याचा धोका असतो. त्यामुळे अशा धाग्यांचा वापर, तसेच इतरवेळी नायलॉन मांज्याची धाग्यांची निर्मिती, विक्री, साठवणूक व वापर करण्यास कायमस्वरुपी बंदी घालण्यात आली आहे.

संपूर्ण जिल्ह्यातील घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापारी, तसेच साठवणूकदारांना नायलॉन मांजाची विक्री, साठवणूक करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. पतंग



उडविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या अशा अविघटनशील नायलॉन मांजामुळे गुरांना उद्भवणारा धोका, माती व पाण्याच्या गुणवत्तेची पातळी घसरणे, तसेच एकंदरीत परिस्थितीत प्राणीजातीला उद्भवत असल्याने प्रतिबंध घालण्यात आले आहे.

पतंग उडविताना केलेल्या नायलॉन मांजाच्या वापरामुळे विजेच्या तारांवर घर्षण होऊन आग लागणे, उपकेंद्रे बंद पडणे, वीज उपकरणे बिघडणे, अपघात घडणे, इजा व जीवित हाणी होणे याबाबतची जनजागृती स्थानिक स्वराज्य संस्था आणि पोलिस विभागाने करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ प्रमाणे कारवाई करण्यात येणार आहे. सदर आदेश ३१ जानेवारीपर्यत लागू राहणार आहे, असे जिल्हादंडाधिकारी सूरज वाघमारे कळविले आहे.

## शरद पवारांचे पाच खासदार फोडा अन् केंद्रात मंत्रिपद घ्या, अजितदादांना ऑफर; संजय राऊतांचा मोठा गौप्यस्फोट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १३ मुंबई**

गुरुवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांचा वाढदिवस होता. या निमित्ताने दिल्लीत मोठ्या राजकीय घडामोडी पाहायला मिळाल्या. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शरद पवारांच्या निवासस्थानी जात त्यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. तर उद्योगपती गौतम अदानी यांच्या दिल्लीतील घरी शरद पवार गटातील एक बडा नेता आणि भाजपच्या एका केंद्रीय नेत्याची बैठक पार पडल्याची माहिती समोर आली. तसेच राष्ट्रवादी शरद पवार गटात दोन गट पडले असून काही खासदार अजित पवार यांच्यासोबत सत्तेत सहभागी होण्यास इच्छुक असल्याची चर्चा आहे. यावरून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे.

संजय राऊत म्हणाले की, अजित पवार गटाला केंद्रात मंत्रीपद मिळालेले नाही. कारण मंत्रीपदाचा केंद्रात फॉर्म्युला




ठरलेला आहे. साधारण सहा खासदारामागे एक मंत्रीपद अशी माझी माहिती आहे. प्रफुल्ल पटेल किंवा अजित पवार गटाला सांगितलं आहे की, तुम्ही पवार साहेबांचे पाच खासदार फोडून घेऊन या. तेव्हा तुमचा सहाचा कोटा पूर्ण होईल आणि मग तुम्हाला मला मंत्री पद देऊ, असा गौप्यस्फोट त्यांनी केला आहे.

**फुटणाऱ्यांना लाज वाटली पाहिजे**

पवार साहेबांनी कष्टाने निवडून आणलेले खासदार, वयाच्या ८४ व्या वर्षी जीवाचे रान करून त्यांनी खासदार निवडून आणले आणि हे लोक त्यांचे पक्ष सोडत असतील तर फुटणाऱ्यांना याची लाज वाटली पाहिजे. ते कोणीही असो, फुटणाऱ्यांना शरम वाटली आहे, असा हल्लाबोल देखील संजय राऊत यांनी केला आहे.

**...तर महाराष्ट्राशी बेईमानी केल्यासारखे होईल**

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे काही खासदार नॉट रिचेबल असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. याबाबत विचारले असता संजय राऊत म्हणाले की, मला असे वाटत नाही. काल वाढदिवसानिमित्त शरद पवार गटाचे सर्व खासदार दिल्लीत उपस्थित होते. काही लोकांनी अद्याप लाज शिल्लक ठेवल्याचे त्यांच्या बोलण्यातून दिसून आले. बाळासाहेब ठाकरेंनंतर शरद पवार एक मोठे नेते आहेत. जर कुणी त्यांच्याशी बेईमानी केली तर ती महाराष्ट्राशी बेईमानी केल्यासारखे होईल, असे त्यांनी म्हटले आहे.

## शिष्यवृत्ती अर्ज तात्काळ सादर करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १३ अमरावती**

विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती फ्रीशिप योजनेंतर्गत प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी महाविद्यालयांनी अर्ज तातडीने सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

सन २०११-१२ ते २०१६-१७ कालावधीतील महाईस्कॉल प्रणालीवरील नोंदणीकृत प्रलंबित, तसेच सन २०१७-१८ वर्षातील ऑफलाईन पद्धतीने स्विकारण्यात आलेल्या अर्जांचा समावेश आहे. अद्यापही महाविद्यालयांनी संबंधित प्रस्ताव इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयास सादर केले नाहीत, अशा महाविद्यालयांना कागदपत्रांसह अर्ज दि. २४ डिसेंबर २०२४ पर्यंत सादर करावे लागणार आहे. यात विलंब झाल्यास प्रस्ताव शासनास सादर करता येणार नाही. त्यामुळे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास याची जबाबदारी प्राचार्यांवर राहणार आहे, असे इतर मागास बहुजन कल्याणच्या सहायक संचालक सरीता बोबडे यांनी कळविले आहे.

## संपादकीय ......

# ‘ड्युरेबल ऑप्टिमिस्ट’

माधव गाडगीळ यांच्यासारख्या ‘तापहीन मार्तंड’ व्यक्तीची महती सद्या:स्थितीत एका वाक्यात विशद करता येईल. ‘‘अर्बन नक्षल न ठरवला गेलेला पर्यावरणवादी’’ या एका विधानात गाडगीळ यांच्या कार्याचे तसेच व्यक्तिमत्त्वाचे महत्त्व अधोरेखित होते. भारतासारख्या अर्धविकसित देशात जेथे विकास ही संकल्पनादेखील जात वा धर्माच्या किंवा उजवे की डावे या नजरेतून पाहिली जाण्याचा धोका असतो, त्या देशात पर्यावरणवादी असणे सोपे नाही. गाडगीळ यांचे दुर्मीळ वैशिष्ट्य असे की त्यांना ‘उजवे’ही मानतात आणि ‘डाव्यां’च्या प्रकाशनांतूनही त्यांचे लिखाण नियमितपणे प्रसिद्ध होत असते. असे दोन्ही बाजूस आदरणीय असणे कमालीचे अवघड. तथापि या उभय-पंथी आदरास पात्र ठरावे म्हणून कोणत्याही युक्त्या, बोटचेपेपणा गाडगीळ यांनी कधी केला नाही. हे अधिक दुर्लभ. अशा या माधव गाडगीळ यांस संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरणविषयक विभागाने ‘चॅम्पियन्स ऑफ द अर्थ’ या पुरस्काराने सन्मानित केले आहे. त्यासाठी गाडगीळ यांचे मन:पूर्वक अभिनंदन. मराठी जनांसाठी हा आनंद अधिक मोठा असेल. त्यामागील कारण गाडगीळ यांचे मराठी असणे हेच नाही. आंतरराष्ट्रीय ख्याती मिळवलेले तसे बरेच मराठी आपल्या आसपास सहज दिसतात. अशांच्या यशात ‘लोकसत्ता’ कधीही ‘मराठी, मराठी’ करत नाचत नाही. गाडगीळ यांचा अपवाद. याचे कारण आंतरराष्ट्रीय पातळीवर ख्यातकीर्त होऊनही गाडगीळ अत्यंत सुलभ, रसाळ, ओघवत्या मराठीत लिहितात. ‘लोकसत्ता’चेही ते नियमित लेखक. त्यामुळे या अनोख्या गौरवात सहभागी होतानाच त्यांच्या मोठेपणाचे मर्म उलगडून सांगणे हे कर्तव्य ठरते.

केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर देशाचेही आर्थिक धोरणाचे दिशादर्शक धनंजयराव गाडगीळ हे माधवरावांचे वडील. त्यांच्या हयातीतच त्यांना पर्यावरण प्रेमाची दीक्षा मिळाली. वडिलांच्या समवेत एका वीज प्रकल्पस्थळी भेट देत असता तेथे होणारी जंगलतोड पाहून धनंजयरावांनी आपल्या लेकाच्या मनात ‘विकासाची किंमत’ ही कल्पना पहिल्यांदा रुजवली. आपल्यासारख्या देशास वीज प्रकल्प तर हवाच, पण इतक्या अमानुष जंगलतोडीची किंमत आपण मोजावी काय, हा त्यांचा प्रश्न होता. भारताची पर्यावरण चर्चा आजतागायत याच प्रश्नाभोवती फिरताना दिसते. प्रकल्पाची नावे तेवढी बदलतात. कधी त्यात नाणार रिफायनरी येते, मग ती बारसूला जाते, जैतापूरचा महाकाय अणुवीज प्रकल्प येतो, नर्मदा सरोवर, उत्तराखंडातील चार धाम महामार्ग प्रकल्प, अस्थिर हिमालयाच्या अंगावर उभे राहणारे जलविद्युत प्रकल्प इत्यादी. यातील कोणत्याही प्रकल्पाच्या उभारणी विचारात पर्यावरण हा मुद्दा नसतो. असलाच तर तोंडदेखला. त्यात पुन्हा आपली विकासाची भूक दुहेरी. एक देश म्हणून विकास प्रकल्पांकडे आपण पाहणार आणि त्याचवेळी आपले अनेक राजकारणी या बड्या प्रकल्प उभारणीच्या निमित्ताने आपली घरे भरणार. हे परस्पर संबंध इतके गुंतागुंतीचे आहेत की या राजकारण्यांच्या हितसंबंधांस विरोध म्हणजे देशाच्या हितास आडकाठी असे म्हणण्यापर्यंत आपली मजल गेलेली आहे. या असल्या बतावण्यांवर विश्वास ठेवणाऱ्यांची संख्याही वाढती आहे हे अधिक विशेष. खरे तर आपल्याकडे जे सुरू आहे तो विकासवाद अजिबात नाही. तो आहे ‘कंत्राटदारवाद’. म्हणजे त्यांच्या सोयीसाठी सरकारी कामे काढणे. अशा परिस्थितीत गाडगीळ यांच्यासारख्यांसमोर अधिकच अडचणी निर्माण होतात.

पण त्यांचे मोठेपण हे की त्यांनी या असल्यांच्या विरोधास कधीही मोजले नाही. ‘पश्चिम घाट बचाव मोहीम’ हे त्याचे जिवंत आणि जाज्वल्य उदाहरण. हा पश्चिम घाट पर्यावरणदृष्ट्या नाजूक आहे आणि त्यातील जैवविविधताही अपार आहे. सबब येथे विकासाचा विचार जपून व्हायला हवा, इतकेच त्यांचे सांगणे. पण ते शास्त्रकाट्याच्या कसोटीवर तर्कशुद्धरीत्या नमूद करता यावे यासाठी गाडगीळ यांनी हा संपूर्ण परिसर पायाखाली घातला. एकदा नव्हे अनेकदा. यातील प्रत्येक पर्यावरणीय घटकाची नोंद केली. वास्तविक गाडगीळ यांस या अहवाल निर्मितीची जबाबदारी दिली होती केंद्रीय पर्यावरण खात्याने. अहवाल आला २०११ साली. पण कोणत्याही चांगल्या अहवालाची गत जशी होते तसेच या अहवालाचेही झाले. त्यानंतर केरळ ते अलिबाग या पट्ट्यात दरड खचण्याच्या एकापेक्षा एक गंभीर घटना घडल्या, शब्दश: हजारोंचे प्राण गेले आणि मग अनेकांना या अहवालाची आठवण झाली.रत्नागिरीजिल्ह्यातील आधी नाणार आणि नंतर बारसू येथे तेल शुद्धीकरण कारखाना काढण्यासंदर्भात जेव्हा वाद-विवाद सुरू झाले तेव्हाही या अहवालाचा संदर्भ आला. या संदर्भात युक्तिवाद करताना त्यांनी शासनाची लबाडी ज्या अभ्यासू पद्धतीने उघडकीस आणली तो अन्य पर्यावरणवाद्यांसाठी धडा आहे. राज्य शासनाने १९९५ साली उद्योग आणि त्यांस सुयोग्य स्थान निश्चित करता यावे यासाठी ‘झोनिंग आराखडा’ तयार केलेला आहे. गाडगीळ यांस हे माहीत असल्याने त्यांनी या विषयावर भूमिका घेण्याआधी सरकारकडे हा आराखडा मागितला. सरकारने टाळाटाळ केली. असा काही आराखडाच नाही येथपासून तो गहाळ झाला असे विविध बचाव सरकारने केले. अखेर गाडगीळ यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करून हा आराखडा मिळवला आणि मग त्याआधारे आपली भूमिका मांडली. ती अर्थातच सरकारला अडचणीची होती. आणि अजूनही आहे. गाडगीळ इतकेच करून थांबले नाहीत. तर त्यांनी सर्व अभ्यासकांसाठी हा आणि असे महत्त्वपूर्ण तपशील इंटरनेटच्या माध्यमातून सहज उपलब्ध होतील, याची व्यवस्था केली. हा पश्चिम घाट असो वा विदर्भातील जंगल, गाडगीळ यांचा या सगळ्याबाबतचा दृष्टिकोन विधायक आणि तरीही पर्यावरण रक्षण हा राहिलेला आहे. विदर्भाच्या जंगलात स्थानिक आदिवासींना हाताशी धरून त्यांनी केलेला झाडे-झुडपे-ऑर्किड आदींच्या नोंदीचा प्रयोग तर एव्हाना सर्वांनाच ठाऊक आहे. या संदर्भात या स्थानिक अशिक्षितांची नोंद आंतरराष्ट्रीय पातळीवरील शोधनिबंधकर्ते म्हणून झाली.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका बॅलेट पेपरवर घ्या

## माजी जि.प सदस्य नितीन हटवार यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १३ नांदगाव पेठ**

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये ईव्हीएम मशीन द्वारे निवडणूका पार पडल्या. त्यामध्ये अनेक त्रुटी असल्याचे निदर्शनास आले तशा आशयाचे पुरावे सुद्धा प्रसिद्ध करण्यात आले. विविध पक्षाकडून आरोप प्रत्यारोप सुद्धा करण्यात आले ही ओरड थांबविण्याकरिता व निवडणुकांमध्ये पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ह्या बॅलेट पेपरवरच घ्याव्यात अशी मागणी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य नीतीन हटवार यांनी केली आहे.



गेल्या तीन वर्षापासून प्रलंबित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नवीन वर्षामध्ये होण्याची शक्यता आहे.परंतु इतका काळ उलटून सुद्धा निवडणूक आयोग आणि सरकार निवडणूक का घोषित करीत नाही याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झालेले आहे. नागरिकांच्या प्राथमिक सोयीसुविधांना ब्रेक लागलेला आहे. त्यांना ज्या सोयी सुविधा उपलब्ध व्हायला पाहिजे त्या उपलब्ध करून देण्यास प्रशासनाची अक्षम्य डोळेझाक सुरू आहे आहे.

प्रशासनातील अधिकारी कर्मचारी हे नागरिकांची प्रलंबित कामे करण्यास तयार नाही ही सर्व कामे करून घेण्याकरिता स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका ताबडतोब होणे गरजेचे आहे. जेणेकरून ग्रामीण भागातील निवडून आलेले जिल्हा परिषद सदस्य,पंचायत समिती सदस्य महानगरपालिकेचे नगरसेवक इत्यादी आपल्या भागातील समस्या त्या त्या सभागृहात प्रखरपणे मांडून प्रशासनाला जागे करण्याची संधी त्या ठिकाणी उपलब्ध होत असते. म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका ताबडतोब घ्याव्या व त्या बॅलेट पेपरवर अशी मागणी नितीन हटवार यांनी केलेली आहे.

# आदिवासी विकास विभागाच्या धारणी प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धा नागरवाडी येथे उत्साहात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १३ चांदूरबाजार**

आदिवासी विकास विभागाच्या, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय धारणी अंतर्गत, श्री गाडगे महाराज अनुदानीत आदिवासी आश्रमशाळा नागरवाडी येथे ३ दिवसीय भव्य दिव्य अशा प्रकल्प स्तरीय क्रीडा स्पर्धा मोठ्या उत्साहात या ठिकाणी पार पडल्या.याप्रसंगी उद्घाटन सोहळ्याला प्रमुख उपस्थित म्हणुन आदिवासी विकास विभाग कार्यालय अमरावती येथिल अप्पर आयुक्त जितेंद्र चौधरी,प्रकल्प अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर, श्री गाडगे महाराज मिशन मुंबचे उपाध्यक्ष बापुसाहबे देशमुख, नागरवाडी आश्रमशाळेचे संचालक सागर देशमुख, सहायक प्रकल्प अधिकारी प्रशासन मौजीलाल मावस्कर, सहायक प्रकल्प अधिकारी शिक्षण जवाहर गाढवे, सहायक प्रकल्प अधिकारी विकास व नियोजन राहूल ठोंबरे, आदिंसह सर्व विस्तार अधिकारी यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.प्रामुख्याने दरवर्षी आदिवासी विभागामार्फत आश्रमशाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना मैदानी खेळात उत्साह निर्माण व्हावा या सद्‌हेतून क्रीडा स्पर्धेचे विशेष




आयोजन करण्यात येते.यावर्षी देखील श्री गाडगे महाराज अनुदानित आश्रमशाळा नागरवाडी येथे केंद्र जारीदा, केंद्र टेंभली, केंद्र सुसर्दा, केंद्र चिरोडी, केंद्र माणिकपुर, केंद्र चिखली, केंद्र टेंब्रुसोंडा या केंद्रतील शासकिय व अनुदानित एकुण ४७ आश्रमशाळेतील १७९४ विद्यार्थ्यांनी सांघीक व वैयक्तीक सामने तसेच सांस्कृतीक कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.दरम्यान क्रीडा स्पर्धा करीता भोजन समिती,मैदान समिती,आरोग्य समिती, सांस्कृतीक समिती, निवास समिती,स्वच्छता समिती,बक्षीस वितरण समिती,तक्रार निवारण समिती, नोंदणी समिती,साहित्य देखभाल समिती आदि सर्व समित्यांचे अतिशय सुनियोजन करत विद्यार्थ्यांना सकाळचा नास्ता,दुपारचे जेवन,दुपारचा नास्ता,रात्रीचे जेवन, विद्यार्थी निवास,मैदानी साहित्य, विद्यार्थ्यांना लागणारे साहित्य,आदी सर्वे गोष्टीची काळजी यावेळी घेण्यात आली.

याच श्रृंखलेत दिमाखदार अशा सांस्कृतीक कार्यक्रमाला आदिवासी विकास विभागाचे अप्पर आयुक्त जितेंद्र चौधरी, उपायुक्त जागृती कुमरे, ए.पी.ओ.शिक्षण किरण चंद्रपुरे, ए.पी.ओ.सादिक शेख यावेळी विशेष उपस्थीत होते. या ३ दिवशीय सामन्यात विजेता ट्रॅफी प्रथम क्रमांक केंद्र जारीदा, व्दितीय क्रमांक केंद्र टेंभली,तृतीय क्रमांक केंद्र चिरोडी यांना प्रकल्प अधिकारी प्रियवंदा म्हाडदळकर समवेत उपस्थीत मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण सोहळ्याला प्रदानकरण्यातआलेक्रीडास्पर्धेच्या यशस्वीतेकरीता प्रकल्प स्तरीय क्रिडा समिती मधील सर्वे सदस्य तसेच नागरवाडी येथिल शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच या ३ दिवशीय कार्यक्रमाचे अतिशय सुंदर सुत्रसंचलन बेलसर यांनी केले.सरतेशेवटी सहायक प्रकल्प अधिकारी जवाहर गाढवे यांनी क्रीडा स्पर्धेला उपस्थीत सर्वांचे आभार मानले.विशेषत क्रीडा स्पर्धे दरम्यान प्रकल्प अधिकारी प्रियवंदा म्हाडदळकर यांनी श्री गाडगे महाराज अनुदानित आश्रमशाळा नागरवाडी येथे सदिच्छा भेट दिली असता संचालक बापुसाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनात, आदिवासी विद्यार्थ्यांना सुरु असलेले ज्ञानदानाचे कार्य तसेच संस्थेचे सेवाभावी कार्य व शालेय सर्व भौतिक सोयी-सुविधा पाहुन समाधान व्यक्त करत विशेष कौतुक केले.

# वाशिंब्या नजीक दुचाकी अपघातात तरुणाचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक दि. १३ मुर्तीजापुर**

राष्ट्रीय महामार्गावर बोरगाव मंजू पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणारे ग्रामवासिंबा बस थांबा जवळ दुचाकीचा अपघात झाल्याची घटना गुरुवार दि.१२ रोजी सकाळच्या सुमारास घडली. या अपघातात दुचाकी स्वार तरुणाचा घटनास्थळी मृत्यू झाला.

याबाबत प्राप्त माहितीनुसार राष्ट्रीय महामार्गावरील वाशिंबा गावाजवळील बस थांब्याजवळ सकाळी दुचाकी क्र.एम.एच.३० बी--एक्स १५६८ मुर्तिजापूर कडून अकोला कडे जात असतांना चालकाचे दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने सरळ समोरच्या रस्त्याच्या डिव्हायडरसह विद्युत लोखंडी खांबावर धडकली.धडक एवढी जबरदस्त धडकली की या अपघातात दुचाकी स्वाराचा घटनास्थळीच मृत्यू झाला. दुचाकीस्वार हा मुर्तिजापूर तालुक्यातील सोपान नारायण धारपवार वय ३२ वर्ष असल्याचे निष्पन्न झाले.घटनेची माहिती मिळताच बोरगाव मंजू पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीवरून बोरगाव म्हणजे पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली.






## तुम्हाला रोज जास्त फळे खाण्याची सवय आहे? मग शरीरावर होऊ शकतो ‘हा’ परिणाम, वाचा तज्ज्ञ काय सांगतात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १३ आरोग्य**

फळं खाणं संतुलित आहारासाठी एक उत्तम पर्याय मानलं जातं. पण, कधी तुम्ही विचार केला आहे का, की तुम्ही जरा जास्तच फळं खाता. कारण जसं प्रत्येक गोष्टीचं प्रमाण महत्त्वाचं आहे, तसंच फळंही जास्त खाल्ल्याने शरीरावर विशेषत: यकृतावर नकारात्मक परिणाम होऊ शकतात.

जेव्हा मोठ्या प्रमाणात फ्रुक्टोज (फळांमधून) यकृतात जातो आणि दीर्घकाळ हेच सुरू असतं, तेव्हा यकृत या अतिरिक्त फ्रुक्टोजचा वापर चरबी तयार करण्यासाठी करतो (हे लिपोजेनेसिस म्हणून ओळखलं जातं), ज्यामुळे नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर डिसीज होऊ शकतो, असं आहारतज्ज्ञ कविता देवगण यांनी त्यांच्या एका इन्स्टाग्राम व्हिडीओमध्ये सांगितलं.

फळांवर आधारित आहार घेतल्यामुळे वजन लवकर कमी होऊ शकतं, असं अनेक लोक मानतात. पण, डॉ. उदय सांगळोदकर, सीनियर कन्सल्टंट हिपॅटोलॉजिस्ट आणि ग्लिनिगल्स हॉस्पिटल्स, परेल येथील लिव्हर आणि ट्रांसप्लांट आयसीयूचे क्लिनिकल लीड यांचे म्हणणे आहे की, फळांमुळे यकृतावर खराब परिणाम होतो असं मानणं चुकीचं आहे. फळांमध्ये असलेल्या फ्रुक्टोजमुळे चरबीचा संचय होऊन नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर डिसीज होऊ शकते, असं लोक म्हणतात, पण अशा दाव्यांच्या आधारावर कोणतेही अध्ययन उपलब्ध नाही, असं डॉक्टर म्हणाले.

फळांचे अत्याधिक सेवन केल्यामुळे यकृताच्या विकारांची कोणतीही घटना नोंदवली गेलेली नाही. पण, फळांचे जास्त सेवन केल्याने काही साइड इफेक्ट्स होऊ शकतात, ज्याची काळजी घेतली पाहिजे, असं डॉ. उदय सांगळोदकर म्हणाले.

फळांचे अनियंत्रित सेवन केल्याने ब्लोटिंग, अतिसार किंवा बद्धकोष्ठता होऊ शकते, कारण फळांमध्ये फायबर्स आणि नैसर्गिक साखरेचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे हलका रेचक प्रभाव होऊ शकतो.

डॉ. सांगळोकार यांच्या म्हणण्यानुसार, फळांमधील नैसर्गिक आम्ल आणि साखरेमुळे दात किडण्यासारख्या समस्या उद्भवू शकतात. जास्त साखर घेतल्यामुळे रक्तातील साखरेची पातळी असामान्य होऊ शकते आणि हे मधुमेह, हायपरग्लायसीमिया किंवा पॅनक्रियास संबंधित समस्या असलेल्या लोकांसाठी चांगले नाही, असे ते म्हणाले.

डॉ. सांगळोदकर म्हणाले, फळांमधील फ्रुक्टोजमुळे इन्सुलिन प्रतिकार, स्थूलता, मधुमेह आणि पौष्टिकतेची कमतरता होऊ शकते. फक्त फळे खाण्याऐवजी पोषण तत्त्वांनी भरपूर आहार घेणं चांगलं आहे. कोणत्याही आहार ट्रेंडचा अंधपणे पालन करू नका आणि त्याचे साइड इफेक्ट्स जाणून घ्या, असे डॉ. सांगळोदकर यांनी सांगितले.


(टीप : हा लेख प्राप्त माहितीवर आधारित आहे. आपल्या दिनचर्येत कोणताही बदल करण्यापूर्वी नेहमी आपल्या आरोग्य चिकित्सकाचा सल्ला घ्या.)

# संपूर्ण परतवाडा शहरच अतिक्रमणाच्या विळख्यात : नगर रचना विभागासह नपची भूमिकाही संशयास्पद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १३ परतवाडा**

अचलपूर तालुक्याची मुख्य बाजारपेठ असलेल्या परतवाडा शहराला विकासाचे वेध लागले असून शहरातील व्यापारी प्रतिष्ठाणे विविध सुविधा व आकर्षक बांधकामांनी सजलेली दिसत आहे . मात्र, याच प्रगतीने आज संपूर्ण परतवाडा शहरच अतिक्रमणाच्या विळख्यात सापडले असल्याचे या शहराचे वास्तव आहे .

शहरातील गुजरी, सदर बाजार, दुराणी चौक,नगर परिषद ते जयस्तंभ चौकातील व्यापाऱ्यांनी केलेली अनेक वाढीव कामे अतिक्रमणात बांधली गेली असून कोट्यवधी किंमतीच्या शासकीय जागा अतिक्रमणाच्या घशात गेल्या आहेत. पद,प्रतिष्ठा व पैशांच्या जोरावर सदर अतिक्रमणे कायम करणाच्या खेळात होत असलेले ’ ’लक्ष्मी दर्शन ’ या अतिक्रमाला प्रोत्साहित करत आहे .



अतिक्रमणाच्या बाबतीत नगर परिषद प्रशासन व नगर रचना विभागाच्या भूमिका संशयास्पद असून अतिक्रमण धारकाशी संगनमताने करार करून अतिक्रमणातील बांधकामे नजरेआड केली जात असल्याचे माहितीच्या अधिकारात मागवलेल्या माहिती वरून उघड झाले आहे . या अतिक्रमधारकांनी अगदी सराईतपणे केलेल्या बांधकाम प्रकरणी नगर रचना व नप प्रशासनातील अधिकारी माहिती मागविणाऱ्याशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संपर्क साधून सदर प्रकरणांवर पडदा टाकण्यासाठी साम, दाम, दंडांचा वापर करत असल्याचे उघड झाले आहे .

शहरातील अनेक प्रतिष्ठीत व्यापाऱ्यांनी आपल्या दुकानाला लागून असलेल्या बोळी व गल्ल्याही ताब्यात घेऊन त्यावर अनधिकृतपणे पक्के व कायम स्वरूपी बांधकामे केलेली असून शहरात अनेक ठिकाणी बांधलेल्या व्यापारी संकुलातील पार्कींगच्या जागाही घशात घातल्या आहेत . यात लाखोंचा व्यवहार होत असून या अतिक्रमण धारकांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी सामान्यांकडून होत असतानांच भ्रष्टाचाराने अंतर्बाह्य पोखरलेल्या व्यवस्थेला आळा बसून शहराला मोकळा श्वास मिळावा अशी अपेक्षा सामान्यांकडून व्यक्त होत आहे .

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंट येथे एआयसीटीई अटल एफडीपी संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १३ अमरावती**

पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंट, अमरावतीच्या इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग विभागामार्फत २ डिसेंबर ते ७ डिसेंबर २०२४ दरम्यान अभियांत्रिकी शिक्षणातील खेढ आणि ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा उपयोग व एकत्रीकरण या विषयावर एआयसीटीई प्रायोजित अटल फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम (एफडीपी) आयोजित करण्यात आला होता.



या सहा दिवसांचा कार्यक्रमात, इंटरनेट ऑफ थिंग्स (खेढ) आणि ब्लॉकचेन सारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा अभियांत्रिकी शिक्षणात कशाप्रकारे क्रांतिकारक उपयोग शोधण्यावर भर दिल्या जाऊ शकतो, असा विश्वास प्रसंगी आयआयटी, एनआयटी आणि विविध विद्यापीठांतील प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ, उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ आणि तंत्रज्ञान विशारद यांनी विविध ६ दिवस आणि १२ सत्रांद्वारे मार्गदर्शन आणि उदधबोधन केले.

या प्रशिक्षनातुन प्राध्यापकांना अद्ययावत ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव देऊन या तंत्रज्ञानाचा त्यांच्या अध्यापन पद्धतींमध्ये प्रभावीरीत्या वापर करण्यासाठी आणि सक्षम करण्याकरिता या प्रशिक्षणाचा नक्कीच उपयोग होईल असा विश्वास या प्रसंगी प्रशिषनार्थी प्राधापाकांनी ७ डिसेंबर रोजी समारोप सत्रामध्ये व्यक्त केला.

या एफडीपी तज्ञांनी विशेष करून खेढ-सक्षम स्मार्ट सिस्टीम्स, ब्लॉकचेन आधारित अभियांत्रिकी समस्यांचे उपाय, आणि नवीन अध्यापन तंत्र यांसारख्या विषयांवर सखोल चर्चासत्रे व कार्यशाळा घेतली. या दरम्यान श्री. मंगेश भारती, एम डी बी मायक्रोसॉफ्ट कंपनी यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे सहभागी प्राध्यापकांना वरील विषयावर प्रात्यक्षिक ज्ञानाचा शैक्षणिक क्षेत्रात कसा करता येईल या वर भर दिला. त्याचप्रमाणे एकदिवसीय औदयोगिक सहलीचे आयोजन पण यावेळी करण्यात आले. सदर सहल रेयांमड लक्सरी कॉटन लिमिटेड, नांदगाव पेठ, अमरावती येते करण्यात आली. प्रध्यापकांना नवीन तंत्रज्ञान अवलंब न्याकरिता असणारी संधी या ठीकणी अवघत झाली.

७ डिसेंबर रोजी समारोप सत्रामध्ये पी. आर. पोटे पाटील कॉलेजचे संचालक डॉ. पी. एम. खोडके आणि प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधीया, उपप्रचार्य डॉ. मोहम्मद झुहैर यांनी या ६ दिवसीय कार्यक्रमाच्या आयोजनाबद्धल अभिनंदन आणि कौतुक व्यक्त केले.

या एफडीपीचे समन्वयक डॉ. एस. बी. वरकड (डीन, गुणवत्ता आश्वासन) आणि डॉ. ए. एस. तेलंग (विभागप्रमुख, इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग) आणि संपूर्ण आयोजकांचे कौतुक या प्रसंगी उपस्थिताकडून करण्यात आले.तंत्रज्ञान एकत्रीकरणाच्या माध्यमातून अभियांत्रिकी शिक्षणात प्रगती घडवण्याच्या प्रयत्नांमध्ये पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंटचे हा प्रशिक्षण कार्यक्रम म्हणजे एक महत्त्वाचे योगदान ठरले.

# श्रीराम मंदिरात श्रीमद्भगवद्गीतेच्या संपूर्ण १८ अध्यायचे सामूहिक पठण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १३ अमरावती**

श्रीराम मंदिर संस्थान जुनी वस्ती, बडनेराच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने रविवार ८ डिसेंबर रोजी श्रीराम मंदिर संस्थान आणि गीता धर्म मंडळ, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीमद् भगवद्गीतेच्या संपूर्ण १८ अध्यायांचे सामूहिक पठणाचा कार्यक्रम अतिशय भक्तिभावात संपन्न झाला.

११ डिसेंबरला मोक्षदा एकादशी अर्थात गीता जयंती होती. त्याच्याच औचित्यानी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गीता धर्म मंडळ गेल्या शंभर वर्षांपासून समाजामध्ये श्रीमद्भागवत गीतेचा प्रचार प्रसार करण्यासाठी अविरत प्रयत्न करत आहे. समाजामध्ये श्रीमद्भगवद्गीतेची ओळख निर्माण व्हावी आणि संपूर्ण जीवनाचे सार असलेली गीता समाजाच्या कंठस्थ व्हावी या या दृढ संकल्पानी गीता धर्म मंडळ कार्य करत आहे.

अमरावतीमध्ये सुद्धा गीता धर्म मंडळ अनेक वर्षांपासून कार्यरत आहे. सौ. वैदेही अणे यांनी संस्थेचे अमरावती मधे इवलेसे रोप लावले होते आज त्याचा बहारदार वृक्ष झाला आहे. अमरावती शहरात गीता धर्म मंडळाच्या माध्यमातून शेकडो स्त्री पुरुष श्रीमद्भगवद्गीता कंठस्थ करण्यासाठी उपासना करत आहे. अतिशय स्पष्ट उच्चार आणि संस्कृत व्याकरणाच्या नियमा प्रमाणे संस्कृत शब्दांचा योग्य त्या ठिकाणी विग्रह करून गीता धर्म मंडळाव्दारे गीतेची संथा दिल्या जाते, त्यामुळे उपासक बंधू भगिनींच्या तोंडून श्रीमद्भगवद्गीता ऐकताना आपण भगवान योगेश्वर श्रीकृष्णांच्या भक्ती मध्ये रमून जातो. गीता धर्म मंडळाच्या अमरावती मधील ८-१० उपासक बंधू-भगिनींना श्रीमद् भगवत गीतेचे संपूर्ण अठरा अध्याय कंठस्थ झालेले आहे. काही जणांची तर पूज्यपाद शंकराचार्यांच्या श्री शृंगेरी पिठाद्वारे श्रीमद्भगवद्गीतेच्या संपूर्ण अठरा अध्यायांवर प्रतिवर्षी घेण्यात येणार्या परीक्षेची तयारी सुद्धा सुरू आहे.

गीता धर्म मंडळ अमरावतीचे सुमारे ६० उपासक या कार्यक्रमाला उपस्थित होते. बडनेरा मध्ये सुद्धा जवळपास ३५ जणांनी श्रीमद्भभगवत गीतेचे संपूर्ण १८ अध्याय वाचून म्हटले. अशा तर्हेने गीतेच्या शंभर उपासकांच्या श्रीमुखातून तब्बल ३ तास श्रीराम मंदिरामध्ये गीतेचे संपूर्ण अध्याय १८ अध्याय म्हणणे सुरू होते. गीता धर्म मंडळ अमरावती च्या सौ.कांचन पाठक, रुपाली घिनमिने यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाच्या शेवटी श्री राम रक्षा स्तोत्राचे सामूहिक पठण झाले, श्री गीतेची आणि रामरायाची आरती झाली, प्रसाद वितरण झाले आणि अल्पोपहरानी या सर्वांगसुंदर कार्यक्रमाचा समारोप झाला.

# सकल हिंदू समाजातर्फे तहसीलदारांना निवेदन

## बांगलादेशातील हिंदू वर होणारे अत्याचार थांबविण्याची मागणी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १३ अंजनगाव सुर्जी**

बांगलादेशातील सरकार बदलल्यामुळे येथील हिंदू समाजातील नागरिकांची हत्या केली जात आहे हिंदू अल्पसंख्यांक असल्याने त्यांची हत्या आणि बलात्कार हे सामान्य झाले आहे बांगलादेशात सत्ता परिवर्तनानंतर हिंदू मंदिरे तोडून मूर्ती फोडून परिसराची विटंबना करण्याच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे सर्व घटना थांबविण्यासाठी भारताने लष्करी बळाचा वापर करून तेथील हिंदूंना सुरक्षा द्यावी यासाठी अंजनगाव सुर्जी येथील सकल हिंदू समाजातर्फे तहसीलदार अंजनगाव सुर्जी यांच्यामार्फत राष्ट्रपतींना निवेदन दिले आहे बांगलादेशातील हिंदू समाजात शांततापूर्ण आंदोलने झाली तेव्हा संतांवर खोटे आरोप करून त्यांना तुरुंगात टाकून अत्याचार केले जात होते बांगलादेश हा आपला शेजारी देश असल्याने ही क्रूरता ताबडतोब थांबवणे आणि मानवी हक्कांचे संरक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे अंजनगाव सुर्जी बजरंग दल विश्व हिंदू परिषद आणि सकल हिंदू समाज यांच्या वतीने भारताचे महामहीम राष्ट्रपतींनी बांगलादेशातील हिंदूचे संरक्षण करावे अशी विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली निवेदन देतेवेळी पवन वैरागडे मुन्ना इसोकार पवन चराटे राहुल ढोले पवन रामेकर गौरव चांदुरकर विनोद पायघन प्रवीण पटुकले सुमित लेंधे योगेश दवे तुषार धारसकर गजानन पाटील प्रणव गाय गोले ओम लोणकर विनोद रेखाते रवी दवे सचिन खोले ऋत्विक धोत्रे अनिकेत गावंडे निरंजन सोनटक्के रितेश आवडकर सुरेंद्र वाघमारे दीप नाथ सुधाकर फुलंबरकर आदी कार्यकर्ते उपस्थित होते .

# अमरावती ते शिर्डी पालखी यात्रेचे आ.सुलभाताई खोडके यांनी केले पुजन

## श्रींचे कृपाशीर्वाद घेत विश्वकल्याणाची केली मनोकामना

## श्रीं साई सेवाधारी पालखी सोहळा समिती अमरावतीचे आयोजन





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १३ अमरावती :**

अमरावती शहराला धार्मिक व अध्यात्मिक सेवेची गौरवशाली परंपरा लाभलेली आहे. ईश्वरीभक्ती व श्रद्धाभाव जोपासत यातून आध्यात्मिक विचारांचा वारसा अविरतपणे जोपासला जात आहे. हाच वसा पुढे नेण्यासाठी शहरात नेहमीच वारकऱ्यांची मांदियाळी दिसून येते. याच शृंखलेत शहर स्थित श्रीं साई सेवाधारी पालखी सोहळा समिती अमरावतीच्या वतीने किरण नगर नंबर १ मधील श्री.साई मंदिर प्रसाद कॉलनी अमरावती येथून शिर्डी स्थित श्री. साई बाबा देवस्थान पर्यंत १२ डिसेंबर ते २ जानेवारी २०२५ पर्यंत पायदळ पालखी यात्रा निघालेली आहे. दरम्यान ही पालखी यात्रा साई नगर स्थित श्री. साई मंदिर येथे पोहोचताच अमरावतीच्या नवनिर्वाचित आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी पालखीचे स्वागत करीत श्री. साई यांच्या चरण पादुकांचे पूजन व दर्शन करीत कृपाशिर्वाद घेतले. यावेळी आमदार महोदयांनी श्री साईच्या चरणी नतमस्तक होवून विश्वमांगल्याची मनोकामना केली. साईबाबा हे आधुनिक संत असून त्यांनी श्रद्धा व सबुरीचा जो संदेश दिला त्यातच मानवी जीवनाचे आत्मिक समाधान लपले आहे. त्यांचे साक्षात्कार सर्वपरिचित असून बाबांचा महिमा सर्वदूर पसरला आहे. मानवकल्याणासाठी आयुष्य वेचिणाऱ्या श्री. साईबाबा यांची पालखी यात्रा म्हणचे सुख, समृद्धी, मांगल्य, भरभराटी साठी केलेला एक जयघोष असून यातून चित्तशुद्धी व आत्मिक समाधान लाभत असल्याचे सांगून आ. सौ. सुलभाताई खोडके यांनी पालखीयात्रेला शुभेच्छ्या प्रदान केल्यात. यावेळी आरती, नैवद्य व महाप्रसाद कार्यक्रम सुद्धा पार पडला. श्रींची मनो-भावे पूजाअर्चना करून पालखी यात्रा पुढील वारी करिता मार्गस्थ झाली. यावेळी वारकरी मंडळी व भक्त परिवार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# उद्या श्री संत गाडगेबाबांच्या ६८ व्या पुण्यतिथी महोत्सवाचा शुभारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १३ अमरावती**

लाखो भाविक भक्तांचे श्रद्धास्थान श्री संत गाडगे महाराज असून दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा श्री संत गाडगेबाबांचा ६८ वा पुण्यतिथी महोत्सव २०२४ चे आयोजन श्री गाडगेबाबा समाधी स्थळ गाडगेबाबा नगर अमरावती च्या वतीने आयोजित केला असून येत्या १४ डिसेंबर ते २१ डिसेंबर दरम्यान भागवत सप्ताह म्हणजेच ज्ञानदान अन्नदान कार्यक्रमाचे आयोजन केले असून १४ डिसेंबरला या कार्यक्रमाचा शुभारंभ सकाळी दहा वाजता गाडगेबाबा च्या समाधीची पूजन व पुण्यतिथी महोत्सव शुभारंभ महानगरपालिका आयुक्त व प्रशासक सचिन जी कलंत्रे यांच्या शुभहस्ते तथा संस्थेचे विश्वस्त व गाडगे महाराज



मिशन मुंबई चे उपाध्यक्ष श्री उत्तमराव उर्फ बापूसाहेब देशमुख यांच्या उपस्थितीत डॉक्टर राजकुमार लंगडे समाजसेवक अमरावती आदी मान्यवरांच्या उपस्थितीत सकाळी साडेदहा ते साडेबारा दरम्यान श्रीमद् भागवत कथा आयोजित केली असून ह भ प वाणीभूषण सोपान महाराज सरोदे यांच्या शुभहस्ते शुभारंभ होणार आहे त्यानंतर दुपारी साडेबारा ते एक च्या दरम्यान अंध अपंग निराश्रीत वृद्ध पुरुष यांना स्वर्गीय श्री नामदेवराव रोडे यांचे स्मृती प्रित्यर्थ राधानगर अमरावती यांच्या वतीने अन्नदान नंतर दुपारी एक ते दोन महिला मंडळाचे भजन राष्ट्रसंत महिला भजन मंडळ संचालिका आशाताई केचे व संच यांचा भजनाचा कार्यक्रम. तरी या पुण्यतिथी उत्सवाच्या निमित्ताने आपण सर्वांनी गाडगेबाबा समाधी स्थळ गाडगेबाबा नगर अमरावती या ठिकाणी उपस्थित राहून तन मन धनाने सहकार्य करावे.

# श्री आर्ट कला वर्गाचा उद्घाटन सोहळा अनेक कार्यक्रमांनी रंगला

## कलावंतांच्या प्रात्यक्षिकाने वेधले अमरावती करांचे लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १३ अमरावती**

श्री आर्ट कला वर्ग व कला निर्माती वर्गाच्या स्थलांतरासह नवीन वास्तूत प्रवेशाच्या उद्घाटन समारंभाच्या प्रसंगी अनेक कार्यक्रमांनी हा सोहळा रंगला, दि ७.१२. २०२४ रोजी पहिल्या दिवशी प्रसिद्ध शिल्पकार शिव प्रजापती यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली तर शिल्पकार शिव प्रजापती यांनी सारंग नागठाणे यांचे आजोबा यांची मॉडेल म्हणून निवड करून मातकामातील अतीशय हुबेहुब असे आजोबांचे व्यक्तीशिल्प साकारले हे पाहून अमरावतीचे रसिक मंत्रमुग्ध झाले, रसिकांनी या प्रात्यक्षिकाला उत्स्फूर्त दाद दिली. दि. ८.१२.२०२४ रोजी प्रत्यक्ष उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष गणेश शिंदे (जिल्हा पोलीस अधिक्षक, अमरावती), माहूर येथील प्रसिद्ध चित्रकार रणजीत दत्त वर्मा तथा श्री आर्ट कला वर्ग व कलानिर्माती वर्गाचे प्राचार्य, संचालक सारंग शरद नागठाने यांच्या हस्ते करण्यात आले. तत्पूर्वी चित्रकार रणजीत वर्मा यांचे अक्रेलिक रंगाचे प्रात्यक्षिक झाले. वर्मा यांच्या कलेला रसिकांनी उत्तम दाद दिली. उदघाटक तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष शिंदे यांनी कला ही समाजाभिमुख असते ,समाजातील सुख दुःखे कलाकार आपला कलेतून मांडत असतो मग ती कोणतीही कला असो असे उद्गार यावेळी काढले कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे एस.एम. आमले (श्री जगदंबा हायस्कुल माहूर सेवानिवृत्त शिक्षक यांनी वर्मा हा माझा विद्यार्थी असून त्याची प्रगती याची डोळा पाहतो आहे असे मनोगतात स्पष्ट केले. दि. ९.१२.२०२४ रोजी श्री आर्ट कलावर्गाच्या सुरुवातीला जेव्हा हे



कला वर्ग सुरु झाले होते त्या वेळच्या पहिल्या उद्घाटक सुरेखा लुंगारे(भा.ज.पा. सचिव महिला मोर्चा म. प्रदेश तथा नगर सेविका) यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून तिसर्या दिवसाचे उद्घाटन करण्यात आले या वेळी प्रमुख पाहूणे विनोद इंगोले (संस्थापक अध्यक्ष विदर्भ कला शिक्षक संघ तथा महाराष्ट्र राज्य कला शिक्षक महासंघ) होते तर इंगोले यांनी आपल्या मेहनतीचे फळ या कला वर्गातून दिसून येत आहे. विदर्भात कला प्रसार व प्रचारासाठी मी अखंडपणे कार्य केले आहे त्याची फलश्रुती या कला वर्गाच्या अनेक विद्यार्थी शिक्षण घेऊन अमरावती तथा विदर्भाचे नाव लौकीक करीत आहे. माजी खासदार अनंत गुढे यांनी कला वर्गास शुभाशिर्वाद दिले तर प्रमुख पाहूणे एन. डी. पाटील प्राचार्य भोसले चित्रकला महाविद्यालय अमरावती यांनी आपल्या मनोगतात असा कला आजपर्यंत पाहण्यात आला नाही. डॉ. पल्लवी चौधरी यांनी अमरावती ही कला रसिकांसाठी कला मेजवानी असून याचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले हेमंतराज कावरे यांनी सर्व कार्यक्रमांचा लाभ घ्यावा यावा असे आवाहन केले.

यावेळी सुनील मुरादे, व्ही. शरद, रुप कुमार राऊत, सुशिल आमले धिरज वाघ, जय ठाकरे, उज्वल कनोजे, समृध्दी पेठे, आशुतोष खंडारें, हर्षल काळकर, ईशान काथवटे,मुक्ता वाघ, स्नेहता गवळी, कोमल गायगोळे, पल्लवी पश्रगृत कविता चोरपगार, रसिका ठवळी, ज्योत्स्ना हसोरिया, अलका सिंघई, संज्योती चव्हाण, लव्हेश रायचंद, विवेक देशमुख,राजुभाऊ हिरूळकर,शरद नागठाणे,भास्कर तायडे,रोशन पत्रे, रवी कापसे, मोहन कदम यांच्या अथक परिश्रमातून हा बहारदार रंगसोहळा रंगला. शेवटी देशभक्तीपर गिताने कार्यक्रमाची सांगता झाली. तसेच कला वर्ग सुरू आहे आपण कला वर्गात चित्रकला विषयाचे मार्गदर्शन व प्रशिक्षण सुरू आहे आपण सर्वांनी कला वर्गाला भेट द्यावी असे आव्हान करण्यात येते .

# मजिप्राच्या अनागोंदी कारभाराविरुध्द शिवसेना आक्रमक

## उग्र आंदोलन छेडण्याचा इशारा


विदर्भ प्रजासत्ताक
दि. १३ अमरावती

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या (मजिप्रा) अनागोंदी कारभारामूळे जनसामान्य नागरिक त्रस्त आहे. शहरात मोठ्या प्रमाणात अवैध नळ कनेक्शन तरीही मजिप्रा प्रकाराकडे दुर्लक्ष करित आहे, आणि जनसामान्यांना अव्वाचे सव्वा पाणी बिल देत आहे. याविरुध्द आक्रमक शिवसेनेने(शिंदे गट) मजिप्रा विरुध्द उग्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.



शुक्रवार दि. १३ डिसेंबर शिवसेनेचे शहरप्रमुख आशिष ठाकरे यांच्या नेतृत्वात नागरिकांनी मजिप्राच्या अधिका:यांना तक्रारीचे निवेदन सादर केले. ज्यामध्ये ग्राहकांना वेळेवर बिले देण्यात येत नाही, मीटर रीडर वेळेवर मीटर रिडींग न घेताच लॉकबिल/फॉल्टी मीटर दाखवून स्वतःच मनाने एव्हरेज बिले देतात. यासर्व बाबींमुळे ग्राहकांना नाहक आधीभार भरावा लागतो व शारीरिक, मानसिक त्रास सहन करत आपल्या कार्यालयाचे उंबरठे झीजवावे लागतात. विहित मुदतीत जर बिले ग्राहकांना अदा केल्या गेली,तर ग्राहक ती बिले भरण्यासाठी त्याची सोय आधीच लावून ठेवतो आणि अपुरा वेळ मिळाला तर गोर गरीब मध्यमवर्गीय पेन्शनधारक चाकरमानी कसे काय वेळेवर बिल भरणार, असा सवाल करण्यात आला. यामुळेच थकबाकीदारांची संख्या वाढत जात आहे आणि आधीभारसुध्दा. तसेच नळाच्या पाण्याची चोरी करणारे, नळावर मशीन लावून पाणी ओढणारे, राजरोसपणे सर्रास अनधिकृत नळकनेक्शन घेणाऱ्यांवर कोणतीच कारवाई होतांना वा पोलिसात तक्रार होतांना दिसत नाही. गरीब जनतेला मात्र त्रास दिल्या जातो. तक्रारकर्त्या ग्राहकाला अधिकारी भेटत नाही. वेळेवर कोणताच अधिकारी उपलब्ध राहत नाही. या ग्राहकांनी जायचे ते कोठे या सर्व बाबींकडे प्रशासनाचे लक्ष असणे गरजेचे आहे. मांडव्या सारख्या ठिकाणी सर्रास रोड फोडून अनधिकृत नळकनेक्श घेतली असतांना त्यांचेवर कारवाई होत नाही. याउलट जो रेगुलर बिल भरतो त्यांनाच त्रास होतो. अमृत योजनेमध्ये जवाहर नगर व इतर नविन वस्त्यांमध्ये नविन कनेक्शन टाकण्यात आले, परंतू अनेकांच्या अजूनही जुने कनेक्शन मीटरविना सुरु आहे. ही लोक नव्या कनेक्शनऐवजी जुन्याच कनेक्शनचा वापर करुन पाणी चोरी करित आहेत. ही बाब सुधारल्या गेली पाहिजे. धनधांडग्या च्या थकीत बिलाकडे दुर्लक्ष आणि गरीबाच्या थोडक्या बिलासाठी त्याचे नळ कनेक्शन तोडल्या जात आहे. वेळेवर बिले दिल्या जात नाही, मिटर रिडींग न घेताचं आपल्याच मनाने बिले देणाऱ्या कंत्राटदारावर त्याचे कंत्राट रद्द करून कार्यवाही करावी. अशी मागणी करत संबधित तक्रारीची दखल न घेतल्यास शिवसेना जनतेला सोबत घेऊन उग्र आंदोलन छेडल्या शिवाय राहणार नाही, असा इशारा यावेळी देण्यात आला.

यावेळी आशिष ठाकरे शिवसेना शहरप्रमुख अमरावती यांच्या समवेत सर्वश्री डॉ तारकेश्वर घोटेकार, सुरेशराव गडवाल, भाष्करराव फोफारे, मोहनलालजी शर्मा, वामनराव वानखडे, सुभाषराव बांगडे, मुकुंद जोशी, विलासराव रघुवंशी, राजनारायण राईकवार, संजय चौधरी,आशिष पाटील,आनंद डहाके,सुरेंद्र शेकोकार,अमोल इंगोले,मंगेश वानखडे, अक्षय उमक,अतुल परतेकी,गणेश देशमुख, संकेत गडवाल, सचिन बांगडे, शंकरराव पेडेकर,शुभम फोफारे, शुभम तायडे, धिरज मिश्रा,राज गिरासे,धिरज तायडे, निलेश भोयर, सुरज गायकवाड, सुरज राईकवार,आकाश गाडे,रुपेश पांडे ईत्यादी बहुसंख्येने परिसरातील नागरिक व पदाधिकारी उपस्थित होते.




# वडगाव राजदी येथील प्रथम केंद्रस्तरीय प्राथमिक शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव सुरू

## जुना धामणगाव समूह साधन केंद्रांचे यशस्वी आयोजन



विदर्भ प्रजासत्ताक
दि. १३ धामणगाव रेल्वे

समूह साधन केंद्र जुना धामणगाव अंतर्गत दोन दिवसीय प्रथम केंद्र प्राथमिक शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे उदघाटन शुक्रवारला (ता.१३) वडगाव राजदी जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात संपन्न झाले.

प्रथम केंद्रस्तरीय क्रीडा महोत्सवाच्या उद्घघाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वडगाव राजदी येथील सरपंच समीर हांडे हे होते.तर उदघाटक म्हणून पंचायत समितीच्या सभापती बेबी उईके हे होते.याप्रसंगी व्यासपीठावर उपसरपंच सुरेश टाले,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजू वालदे,

माजी शिक्षण विस्तार अधिकारी सुनील रोंघे,गटसमन्वयक धीरज जवळकार,केंद्रप्रमुख जगदिशकुमार सिरसाट,प्रफुल्ल डाफ,प्रभात विद्यालयाचे मुख्याध्यापक,ग्रामपंचायत सदस्य,उमेश हांडे,अनुसया तुपट,माधुरी घोडेस्वार,शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्ष करुणा पाटील,

बाबाराव मुद्रके,निलेशराव मसराम,चंदा कुऱ्हाडकर, अर्चना मोहळे, सिमा मसराम, स्वाती शेंडे,जया कोसरे,अमोल भागडकर,उमेश हांडे,चंदु तुपट, प्रफुल्ल रामटेके,किरण वानखडे,मुख्याध्यापक प्रफुल्ल महल्ले आदी उपस्थित होते.कार्यक्रमाचे मुख्याध्यापक प्रफुल्ल महल्ले यांनी केले.संचालन रामकिसन चव्हाण यांनी केले तर आभार किरण वानखडे यांनी मानले.या प्रथम केंद्र क्रीडा महोत्सवात गंगाजळी, सालनापूर, रामगाव,जळगाव आर्वी,तिवरा,शहापूर,जुना धामणगाव, गुंजी, कासारखेड, वाघोली, परसोडी, वडगाव राजदी, हिंगणगाव,वडगाव बाजदी, दिपोरी, भिल्ली ,विरूळ रोंघे,सालनापुर यांच्यासह आदी शाळांतील खेळाडू विद्यार्थी सहभागी झाले होते.

# अकोला येथे सज्जनगड येथून श्री समर्थ रामदासस्वामी यांच्या चरण पादुकाचे आगमन

विदर्भ प्रजासत्ताक
दि. १३ अकोला :

स्थानिक अकोला येथे सज्जनगड येथून श्री समर्थ रामदासस्वामी यांच्या चरण पादुकाचे आगमन दिनांक १९/१२/२०२४ ते २८/१२/२०२४ या दरम्यान पार्थसारथी शुक्ल मंगल कार्यालयात मुक्कामी राहणार आहे.

सदर सज्जनगड येथून श्री समर्थ रामदासस्वामी यांच्या चरण पादुका यांचे अकोला नगरीत दि १९/१२/२०२४ रोजी दुपारी ५.०० वाजता श्रीराम मंदिर रामदासी मठ सुभाष चौक अकोला येथे येणार आहे. येथून त्यांची मिरवणूक श्रीराम मंदिर रामदासी मठ सुभाष चौक, रॉयल बेकरी, अग्रेसन चौक, नाना उजवणे यांच्या घरासमोरून पार्थसारथी शुक्ल मंगल कार्यालयात येतील ड़. दिनांक २०/१२/२०२४ पासून सकाळी काकड आरती, सकाळी ८ ते १२ विविध विभागात भिक्षा फेरी ,दुपारी ०३ वाजता पार्थसारथी शुक्ल मंगल कार्यालयात भजन , सायंकाळी ०६ ते ९ वेळेत समर्थ भक्त अमय गुणे बुबा रामदासी यांचे सुश्राव्य कीर्तनाचा अकोलेकारांनी लाभ घ्यावा.

यासाठी दि. ०१/१२/२०२४ रोजी श्रीराम मंदिर रामदासी मठ सुभाष चौक अकोला येथे याच्या नियोजनासाठी बैठक घेण्यात आली. या बैठकीत वैद्यकीय व्यवस्था, भोजन व्यवस्था कीर्तन व्यवस्था व कार्यालय व्यवस्था ठरविण्यात आल्या. त्यासोबतच मिरवणुकीतील जबाबदारी सुद्धा सोपविण्यात आल्या. तसेच पद्य पूजेकरीता श्री समर्थ पादुका कोठे व कोणाकडे कोणत्या दिवशी न्याव्यात तसेच भिक्षा फेरी दि. २०/१२/२०२४ रोजी रामदास पेठ, गड्डम प्लॉट, राधाकिसन प्लॉट, जठारपेठ दि २१/१२/२०२४ जोगळेकर प्लॉट , ज्ञानेश्वर नगर, फडके नगर, वानखडे नगर दि २२/१२/२०२४ गोडबोले प्लॉट, रेणुका नगर, आश्रय नगर २३/१२/२०२४ कौलखेड, खेतान नगर, केशव नगर, परिवार कॉलोनी २४/१२/२०२४ अगरवेश , गणपती गल्ली, शिवचरण पेठ , गणेश नगर २५/१२/२०२४ कॉंग्रेस नगर, दत्त कॉलोनी, गौरक्षण रोड, आळशी प्लॉट २६/१२/२०२४ महसूल कॉलोनी, पत्रकार कॉलोनी , आकाशवाणी मागील एरीया, आमनखा प्लॉट २७/१२/२०२४ राउत वाडी, प्रोफेसर कॉलोनी, सुधीर कॉलोनी, चर्तुभुज कॉलोनी अश्या प्रकारे बैठकीमध्ये ठरविण्यात आले आहे . वरील तारखेला ज्या भागात भिक्षाफेरी येणार आहे पादुकाबरोबर आलेली सज्जनगड वरील रामदासी मंडळी हि भागात सांप्रदायिक भिक्षेकरिता येणार रामदासी मंडळीच्या झोळीत कोणत्याही प्रकारचे धान्य- गहू, तांदूळ, डाळ तथा द्रव्य अर्पण करून श्री समर्थ सेवेचे श्रेय संपादन करा. हि जमा झालेली भिक्षा सज्जनगड येथे दरोज होणाऱ्या अन्नदानासाठी वापरली जाते . तसेच जर कोणाला वरील व्यवस्थेमध्ये सहभागी व्हावयाचे असेल व पादुका पद्य पूजनासाठी कोणाला घरी न्यावयाच्या असेल त्यांनी श्रीराम मंदिर रामदासी मठ सुभाष चौक अकोला येथे संपर्क करावा. असे आवाहन सज्जनगड वरून समर्थ भक्त योगेशबुवा रामदासी श्री समर्थ सेवा मंडळ सज्जनगड यांनी सागितले.

# शालेय राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा : महाराष्ट्राचे मुले व मुली संघ उपविजेता

विदर्भ प्रजासत्ताक
दि. १३ अमरावती




महाराष्ट्र शासनाच्या यजमान पदाखाली अमरावती शहरात झालेल्या १४ वर्षाआतील ६८ व्या राष्ट्रीय शालेय कबड्डी स्पर्धेमध्ये यजमान महाराष्ट्राचे मुले व मुलींचे दोन्ही संघ उपविजेता ठरले. तर या दोन्ही गटात हरियाणाचे संघ अजिंक्य ठरले. महाराष्ट्राच्या दोन्ही संघाने अंतिम सामन्यात हरियाणाला कडवी झुंज दिली मात्र हरियाणाच्या कबड्डीपटूंनी आपल्या रोमहर्षक खेळाचे प्रदर्शन करीत महाराष्ट्राला पराभूत केले. या शालेय राष्ट्रीय स्पर्धेत मुले व मुलींचे दोन्ही अंतिम सामने महाराष्ट्र विरुध्द हरीयाणा यांच्यात रंगले. त्यामध्ये मुलांच्या गटातून प्रथम क्रमांक हरीयाणा (५६ गुण) तर व्दितीय क्रमांक महाराष्ट्र (२९ गुण) तृतीय क्रमांक कर्नाटक या संघाचा राहिला. मुलींच्या गटामध्ये प्रथम क्रमांक हरीयाणा (२३ गुण) व्दितीय क्रमांक महाराष्ट्र (२५ गुण) तर तृतीय स्थानी दिल्ली संघाला समाधान मानावे लागले.

या स्पर्धेचा समारोप व बक्षिस वितरण अतिरिक्त जिल्हाधिकारी सुरेश वाघमारे, विदर्भ कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष जितेंद्र ठाकुर, महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, डॉ. जाधव (डीप्टी कलेक्टर), श्री भटकर निवासी जिल्हाधिकारी, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापिठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. अध्यक्षस्थानी विभागीय क्रीडा उपसंचालक विजय संतान होते. स्पर्धा यशस्वी करण्याकरीता कबड्डी संघटनेचे जितेंद्र ठाकुर, जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, घनश्याम राठोड, जिल्हा क्रीडा अधिकारी, यवतमाळ, लता गुप्ता, जिल्हा क्रीडा अधिकारी, वाशिम, बाळकृष्ण महानकर जिल्हा क्रीडा अधिकारी, बुलढाणा, सतीशचंद्र भट, जिल्हा क्रीडा अधिकारी अकोला, प्रदीप शेटीये, संजय पांडे, तालुका क्रीडा अधिकारी, संजय कथळकर, लक्ष्मीशंकर यादव, विजय खोकले, राजू वडते, संतोष विघ्ने, वैशाली इंगळे, त्रिवेणी बांते, अनुप वानखडे, विजया खोत, किशोर बोंडे, अनिल इंगळे, स्वप्नील चांदेकर,राहुल निवडंगे, रितेश अनंतवार अमर जाधव, प्रफ्फुल डांगे, पुजा मटकर, संजय मनवर, परमेश्वर ठाकरे, प्रविण टेकाडे, अनिल भुईभार, अशोक खंडारे, शेख अकील, शुभम मोहतुरे, पायल कोकाटे, कल्याणी रत्नपारखी,वैभव पातुर्ड, राजपाल इंगळे, संदीप इंगोले, विजय मोटघरे, श्याम वानखडे, निखील मस्के, गिरिष कुकडे, जिवन मोहिते, आानेश्वर गोरे, निलेश जाधव, श्याम मोकरे, राहुल महिगे, उमेश कांबळे, संघरक्षक बडगे, सोनल रंगारी, बाळासाहेब साखरे, नरेंद्र गाडे, सागर बोरकर, प्रा. अतुल पाटील, प्रा. सुहास गांवडे आदींनी सहकार्य केले.

# विद्यापीठात देश का प्रकृति परिक्षण अभियान कार्यक्रम

## श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळव्दारा संचालित विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयाचे आयोजन

विदर्भ प्रजासत्ताक
दि. १३ अमरावती

केंद्र शासन व आयुष मंत्रालय, भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोगाने आयुर्वेद दिनानिमित्त देशभरात २६ नोव्हेंबर ते २५ डिसेंबर, २०२४ या कालावधीत देश का प्रकृति परिक्षण अभियान हा कार्यक्रम राबविण्याची घोषणा केली आहे. त्यानुषंगाने स्थानिक श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळव्दारा संचालित विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयाच्यावतीने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील सर्व अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांकरीता देश का प्रकृति परिक्षण अभियान १३ डिसेंबर पासून राबविण्यात येत आहे. या अभियानामध्ये विद्यापीठातील सर्व अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी मोठए संख्येने सहभाग घेऊन लाभ घ्यावा. तसेच विभागामध्ये येणा-या तज्ज्ञ चमूस सहकार्य करावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यापीठाच्या आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात यांनी केले आहे.

# सर्व नियमांचे काटेकोर पालन करूनच निवडणूक प्रक्रिया पूर्ण

## पाचही मतदारसंघांत उमेदवारांच्या प्रतिनिधींसमक्ष व्हीव्हीपॅट स्लीप मोजणी पूर्ण

विदर्भ प्रजासत्ताक
दि. १३ अकोला

जिल्ह्यात निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार प्रत्येक बाबीचे काटेकोर पालन करत मतदान व मतमोजणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. पाचही मतदारसंघातील २५ मतदान केंद्रावरील व्हीव्हीपॅट स्लीपची मोजणी उमेदवारांच्या प्रतिनिधीसमक्ष करण्यात आली आहे, असे जिल्हा निवडणूक अधिकारी तसा जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी सांगितले.

ईव्हीएम यंत्रांच्या प्रथमस्तरीय तपासणीपासून ते मतदान होऊन यंत्रे सीलबंद करून स्ट्रॉंगरूममध्ये जमा होण्यापर्यंत प्रत्येक टप्प्यावरील प्रक्रिया राजकीय पक्ष व उमेदवारांच्या प्रतिनिधींच्या समक्ष प्रूण केली जाते. त्यामुळे हस्तक्षेपाला किंवा फेरफार करण्यास कुठेही वाव नसतो. नियमांचे काटेकोर पालन करूनच ही प्रक्रिया पूर्ण होते.

प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रांच्या क्रमांकामधून लॉटरी पध्दतीने निवडलेल्या ५ मतदान केंद्रांवरील व्हीव्हीपॅट मशिन्सच्या स्लीप्सची मोजणी बंधनकारक आहे. या प्रक्रियेला उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित असतात. ईव्हीएममधील प्रत्येक उमेदवाराच्या मतसंख्येशी व्हीव्हीपॅट स्लीप्सची संख्या पडताळणे हा ह्या प्रक्रियेचा उद्देश आहे.




महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या मतमोजणीच्या वेळेस जिल्ह्यातील पाच मतदारसंघांमध्ये एकूण २५ व्हीव्हीपॅटमधील स्लीप्सची अनिवार्य मोजणी दि.२३ नोव्हेंबर २०२४ रोजी पूर्ण करण्यात आली आहे. मतमोजणीच्या दिवशी सर्व मतदारसंघांमध्ये प्रत्येकी ५ मतदान केंद्रांच्या क्रमांकाची सरमिसळ करून भारत निवडणूक आयोगाच्या निरीक्षकांच्या समोर आणि उमेदवारांच्या मतमोजणी प्रतिनिधींच्या उपस्थितीत मतदान केंद्रे निवडण्यात आली. या केंद्रांतील मतमोजणीनंतर ईव्हीएममधील मतांची उमेदवारनिहाय संख्या आणि व्हीव्हीपॅट मशीनमधील उमेदवारनिहाय स्लीप्सची संख्या यामध्ये कुठेही तफावत आढळून आलेली नाही.

ही प्रक्रिया प्रत्येक मतमोजणी केंद्रात उपस्थित असलेल्या उमेदवारांच्या प्रतिनिधींसमोरच पार पडलेली असल्याने, प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित प्रक्रिया पूर्ण झाल्याच्या दस्तऐवजांवरही या प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

व्हीव्हीपॅट स्लीप्सच्या मोजणीच्या या संपूर्ण प्रक्रियेसाठी, प्रत्येक मतमोजणी केंद्रावर विशेष सुरक्षेची काळजी घेऊन स्वतंत्र कक्ष उभारण्यात आलेला होता, आणि या संपूर्ण प्रक्रियेचे सीसीटिव्ही कव्हरेज तसेच चित्रिकरण करण्यात येऊन ते जतन केले गेले आहे.

मतमोजणीच्या संदर्भातील भारत निवडणूक आयोगाच्या विहित प्रक्रियेनुसार व्हीव्हीपॅट स्लीपची गणना पूर्ण झाल्याशिवाय मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होत नाही, तसेच विजयी उमेदवार जाहीर करता येत नाही. त्यानुसार जिल्ह्यातील पाचही मतदारसंघांमध्ये याबाबतच्या सर्व नियमांचे काटेकोर पालन करण्यात आले आहे.